# शैक्षणिक माध्यमातून अपंगांचा सर्वांगिण विकास

**शितल पंढरीनाथ तुपे**
संशोधक विद्यार्थीनी
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
sheetaldipaknikam@gmail.com

मानवाच्या जीवनात शिक्षणाला अनन्यसाधरण महत्व आहे. मानव तर जन्मापासून मरेपर्यत विविध माध्यमाद्वारे शिकत असतो. मात्र एक नियोजित पध्दतीने, विविध शैक्षणिक साहित्य वापरुन, विविध अध्ययन पध्दती वापरुन अशा शास्त्रशुध्द पध्दतीने दिलेले शिक्षण हे अधिक प्रभावी ठरते. प्रभावशाली शैक्षणिक पध्दतीमुळे आज खूप मोठया प्रमाणात विकास आपणास साधता आला आहे. शिक्षणाची सोय सर्व ठिकाणी पोहचण्यासाठी विविध वाडी-वस्तीवर शाळा सुरु करण्यात आल्या आहे. मोठया प्रमाणात या ठिकाणी मुलांना शिक्षणांच्या प्रवाहात आणण्यात येत आहे. परंतु विविध डोंगरदऱ्या, दूर्जन भाग, मागासलेल्या वस्त्या, झोपडपट्टीतील मुले व याशिवाय अंपग मुले शिक्षणापासून वंचित राहत असल्याचे आपल्या दिसून येते. समाजाचा सर्वांगिण विकास साधायचा असेल तर समाजातील सर्व घटकांना शिक्षणाचा संधी उपलब्ध करुन देणे क्रमप्राप्त आहे.

समाजातील एकाच घटकाला शिक्षण देऊन संपूर्ण राष्ट्राची प्रगती आपणास साधता येणार नाही. समाजातील सर्व स्तरातील मुलांना शिक्षण देणे गरजेचे आहे. देशातील विविध व्यंग असलेल्या अपंग मुलांना विविध अंगानी शिक्षण दिले तर त्यांची प्रगती होईल व त्यांच्यातील या विविध घटकांची प्रगती झाली तर संपूर्ण देशाची प्रगती होईल. व खऱ्या अर्थ्यांने आपणास विकास झाला आहे असे एकमताने म्हणता येईल. शासनामार्फत अशा विविध स्तरातील अपंग मुला-मुलीसाठी विविध योजना राबविण्यात येत आहे. अशा योजनाच्या माध्यामातुन या अपंग मुलामुलींचा सर्वांगिंण विकास साधण्यास निश्चित मदत होत असल्याचे आपणास दिसून येत आहे.

समाजातील सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणजे अपंग विद्यार्थी होय. या विविध प्रकारचे अपंगत्व असलेल्या विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होणे खूप महत्त्वाचे आहे. या मुलांचा विकास होण्यासाठी, या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी अगोदर आपल्याला सर्वात आधी शिक्षकांचे, लोकप्रतीनिधीचे, व पालक वर्गांचे मनपरिवर्तन करणे आवश्यक आहे. समाजामध्ये खूप असे पालक आहे की, जे आपल्या पाल्यांचे व्यंग लपवतात. त्यामागे त्यांची वेगवेगळी कारणे असतात. आपली समाजामध्ये एक चांगली प्रतिष्ठा आहे, आणि आपले अपत्य हे अपंग आहे. त्यामुळे लोक आपल्याला काय म्हणतील, आपला अपमान होईल याशिवाय अशा अनेक नको त्या बुरसटलेल्या विचाराने ते प्रभावित झालेले असल्याने आणि

त्यांच्यामध्ये याबाबत अज्ञान असल्याने ते अशा प्रकारचे विचार करतात आणि त्यानुसार आपल्या पाल्यांचे अपंगत्व लपवतात.

अशा पालकांसाठी प्रसार माध्यमानामार्फत, विविध लोकप्रतीनिधीमार्फत जनजागृत्ती करणे आवश्यक आहे. पालकांना आपल्या व्यंग असलेल्या पाल्याबाबत जबाबदारीची जाणीव करुन देणे गरजेचे आहे. अशा व्यंग असलेल्या मुलांना योग्य वेळी उपाय योजना केली तर त्यांचे व्यंग नाहीसे होईल. संपूर्ण नाहीसे झाले नाही तरी त्यामध्ये निश्चित एक सुधारणा होईल. अशी व्यंग असलेली मुले शिकली तर त्यांच्या राहणीमानात बदल होईल. त्यांच्या सुप्त गुणांचा विकास होईल, त्यांचा सर्वोगिण विकासास चालना मिळेल व यातून त्याचे व्यक्तिमत्व सुधारेल. त्यांचे व्यक्तिमत्त्व सुधारले तर त्यांच्या कुटूंबाचा विकास होईल व कुटूंबाचा विकास झाला तर देशाचा विकास होईल. अशा प्रकारचे विचार प्रत्येक पालकांना समजण्यासाठी या समाजातील विविध घटकांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

अशा अपंग मुला-मुलींसाठी शिक्षणाच्या कक्षा मोठया प्रमाणात विकसीत करण्यात आल्या आहे. अशा अपंग मुलांसाठी शाळेची रचना, त्याअनुषंगाने इतर सुविसुविधा उपलब्ध करुन यामध्ये पालकांना सहभागी करुन घेता येईल. यामुळे या मुलांच्या बाबतीत असणारा दृष्टीकोन बदलेल. याकामी आपणास विविध सेवाभावी काम करणाऱ्या संस्था, लोकप्रतीनिधी, समाज, या क्षेत्रातील अनुभवी तज्ञ, समुपदेशक अशा लोकांची मदत घेऊन अपंग विद्यार्थ्यांचे भवितव्य सुरक्षित आणि यशस्वी होण्यास मदत होईल.

समाजातील अपंग विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास साधतांना आपणास काही ध्येय, उद्दिटये ठरवून घ्यावी लागेल व त्याप्रमाणे कार्य करावे लागेल. यामध्ये आपणास शिक्षकांना अपंग शिक्षण विषयक माहिती उपलब्ध करुन देणे. शिक्षकांना अपंग शिक्षण विषयक भौतिक सुविधांचा अभ्यास करण्यास प्रवृत्त करणे. प्राथमिक शिक्षणासाठी भौतिक सुविधा मिळण्यासाठी प्रवृत्त करणे, विविध स्त्रोताची माहिती घेणे व स्वत:जवळ उपलब्ध ठेवणे आवश्यक आहे. या शिक्षक वर्गास या संबधी वेगवेगळे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. तसेच या भौतिक साहित्याचा वापर विद्यार्थ्यांना करतांना वेळोवेळी येणाऱ्या अडीअडचणी सोडवणे आवश्यक आहे. त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे, त्यांच्या अपंगत्वानूसार त्यांना त्या-त्या सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे. उदा. अशा अपंग मुलांना शैक्षणिक साहित्य व वैदयकिय साधने उपलब्ध करुन देणे महत्त्वाचे आहे.

समाजामध्ये आपल्या परिसरात, बाजुबाूला, गावात, शाळेत अशी काही मुले असतात जी सर्वसामान्य मुलांप्रमाणे नसतात. विविध अंगाने अपंग असणारे विद्यार्थ्यामध्ये कर्णबधिर, अंधगट, मानसिक अपंगत्व, मेंदूचा पक्षाघात, अध्ययन अक्षमता, अस्थिव्यंग, स्वमग्नता इ. प्रकार प्रामुख्याने आढळून येतात. अशा विद्यार्थ्यांना विशेष गरजा असलेले विद्यार्थी असे सुध्दा म्हणतात. अशा विद्यार्थ्यांमध्ये वेगवेगळे व्यंग असल्याने अशा मुलांना अपंग म्हणून संबोधले जाते. वेगवेगळया प्रकारचे अपंगत्व त्यांच्यामध्ये असू शकते. त्या मुलांच्या अपंगत्वाच्या प्रकारावरुन बरेचदा त्यांना संबोधले जाते. उदा. मुका, बहिरा, लंगडा, थिटा इ. पण अशीही काही मुले असतात की ज्यांचे हात-पाय धड दिसतात पण त्यांच्या हालचाली विचित्र असतात.

अशा मुलांना बावळट, लुळा असे कधी संबोधले जाते. तर कधी अंगावरुन वारे गेले आहे, लकवा भरला आहे असे शब्द प्रयोग केले जातात. अशा विचित्र हालचाली हे मुले जाणीव पूर्वक करीत नसतात. तर तो पण एक अपंगात्वाचा प्रकार असतो.

अपंग विद्यार्थ्यांचा सर्वागिण विकास होणे आवश्यक आहे. असा विकास साधत असतांना त्या विद्यार्थ्यांच्या अपंगाला करणीभूत असणारे विविध घटक शोधणे आवश्यक आहे. ज्या घटकामुळे त्याला अपंगत्व आले असेल त्याचे निधान झाले तर त्यानुसार त्याला उपचार देता येईल. तसेच विविध कारणाने होणारे अपंगत्व काही प्रमाणात का होईना पण कमी करता येईल. उदा. अपंगत्वास कारणभूत असणारे घटक म्हणजे पोलिओ, कुष्ठरोग, हाडांचा कर्करोग, डोक्याला लागलेला जबर मार, हाडांचा क्षयरोग, जन्मजात, मधुमेह, लकवा, अपघात, ऑस्टिओ मायलायटिस, जीवनसत्व क च्या कमतरतेमुळे मुडदूस, संधिवात इ. आढळून येतात. अशा विविध कारणामुळे अपंगत्व मोठया प्रमाणात येत असते. ज्या कारणामुळे अपंगत्व येते, त्यालाच काही प्रतिबंधक उपाय केले तर निश्चित मोठया प्रमाणात अपंगत्व कमी करता येऊ शकते. जसे पोलिव, क्षयरोगापासून बचाव करणसाठी काविळ, बीसीजी लसीकरण. अपघात होणार नाही याची दक्षता घ्यावी. क्षयरोग, कुष्ठरोग, मधुमेह असणाऱ्यांनी निदान व उपचार घ्यावे. सुदृढ शरीर व त्याची निगा, व्यायाम व नियमितता, स्वच्छ परिसर, वैयक्तिक आरोग्य जपणे, जीवनसत्वयुक्त आहार, पौष्टिक ताजे जेवण, फळे हिरव्या पालेभाज्या, दुध, दही, मोड आलेले कडधान्ये इ. सेवन करणे. सर्वात महत्वाचे म्हणजे अपंगत्व लक्षात येताच तात्काळ उपचार करणे आवश्यक आहे.

सर्व सामान्य मुलाप्रमाणे हे मुले शाळा परिसरात खेळू शकत नाही. त्यामुळे अशा मुलांना अडथळा नसेल असा शाळेचा परिसर उपलब्ध हवा. अशा मुलांना वर्गात / शाळेत चढण्यासाठी रॅम्प असावा किंवा उतरण असावी. विंशिष्ट प्रकारचे स्वच्छतागृह असावे. पिण्याच्या पाण्याची अनुकूल अशी व्यवस्था असावी. अशा मुलांना शिक्षण देण्यात येणारा वर्ग हा तळमजल्यावर असावा. या मुलांसाठी शक्यतो वर्गखोली मोठी असावी. समोर मोठा बाक असावा व तेथे त्यांची कृत्रिम उपकरणे ठेवण्यासाठी मोठी जागा उपलब्ध असावी. सदरील वर्गाला उंबरठा नसावा व वर्गाच्या फडश्या हया गुळगुळीत न ठेवता खरखरीत असाव्यात. या मुलांसाठी स्वच्छतालय मोठे, खुर्ची, तीनचाकी सायकल जाऊ शकेल इतके मोठे असावे. अशा मुलांना मनोरंजनासाठी व त्यांचा व्यक्तिविकास घडून येण्यासाठी बुध्दिबळपट, कॅरमबोर्ड, व्हॅलीबॉल्स, तसेच त्यांना अनुकूल खेळ खेळता येईल असे विविध उपकरणे असावेत. कर्णबंधीर मुलांना श्रवणयंत्र, दृष्टिदोष असणाऱ्यांना चष्मे, ब्रेल पाटया, टेपरेकॉर्डर अशा प्रकारचे उपकरणे त्यांच्या गरजेनुसार उपलब्ध असावे. म्हणजेच त्यातून त्यांच्या कलागूणांना वाव मिळेल.

*** अपंग विद्यार्थ्यासाठी असणाऱ्या सुविधा व फायदे :-**

विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती, प्रवासभत्ता, गणवेशभत्ता, शैक्षणिक भत्ता, आयकर सवलत, रोजगरासाठी आरक्षण व इतर सवलती या मुलांना मिळाव्यात. आर्थिकदृष्टया मागासलेल्या अपंग व्यक्तींना जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यामार्फत कृत्रिम साधनाचे वाटप करण्यात येते. तसेच विविध अवयवाचे

सुध्दा वाटप करण्यात येते. अशा प्रकारे अपंग व्यक्तीचा शैक्षणिक, आर्थीक, सामाजिक व मानसिक विकास या माध्यमातून होण्यास मदत होते.

*** अपंग विद्यार्थी आणि शिक्षक :-**

अपंग विद्यार्थ्यांच्या घडवणीमध्ये शिक्षकाची भूमिका ही फार महत्वाची असते. शिक्षकांनी या विद्यार्थ्यांना अपंग म्हणून भेदभाव न करता सामान्य विद्यार्थ्यांप्रमाणेच त्यांच्याशी साम्य ठेवावे. अशा विद्यार्थ्यांशी भावनिक जवळकीचे संबंध निर्माण करावे. त्या विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देऊन, त्यांच्या पालकांशी सतत संपर्क ठेवावा. अशा विद्यार्थ्यांचे बोलणे एकूण घ्यावे, त्यांना समजून घ्यावे, त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करावे. अपंग विद्यार्थी सुध्दा सामान्य विद्यार्थ्यांप्रमाणे अधिक समर्थपणे शिक्षण घेऊ शकतात. आत्मविश्वासाने खेळू शकतात. असा आत्मविश्वास या विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करावा. अपंगांना सुध्दा एक चांगला मानुस म्हणून जगण्याचा अधिकार आहे. याची जाणीव त्यांच्यामध्ये निर्माण करावी. व स्वत: ते स्वावलंबी बनतील या हेतून निस्वार्थ सेवा करावी. हाताला हात दया, अपंगांना साथ दया. या सामाजिक जाणीवेतून त्यांच्या साठी काम करावे.

समाजामध्ये अपंग विद्यार्थ्यांचे प्रमाण खूप मोठया प्रमाणात आढळते. अशा या अपंग विद्यार्थ्यांना नियमित शिक्षण, मार्गदर्शन व योग्य सोईसुविधा उपलब्ध करुन दिल्यास त्यांचा सर्वांगिण विकास होण्यास मदत होईल. त्यांचे राहणीमान सुधारेल, ते निटनेटके राहण्यास शिकतील. एकंदरीत त्यांचा शारीरिक, भावनिक, मानसिक सर्वांगिण विकास होईल व त्यांच्या मनातील अपंगाची भावना नष्ट होऊन ते सर्व सामान्याप्रमाणे जीवन जगू शकतील.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) समावेशक शिक्षक शैक्षणिक साहित्य निर्मिती आणि वापर शिक्षकांचे उद्‌बोधन - प्रा. डी.सी.केंगार, श्री. बी.के.माने, सौ. जे.बी. रणपिसे, पृ.क.३१०, रुना ग्राफिक्स प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००५.
२) अपंगाच्या शाळांकरीता विशेष शाळासंहिता - महाराष्ट्र शासन समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग मुंबई पृ.क्र. १, सन १९८५.
३) अपंगाची हाक
४) - गोखले, शरदचंद्र दामोदर, चिरंजीव ग्रंथ प्रकाशन पुणे, पृ.क.१२६, प्रथमावृत्ती १९६५.